# विभाग प्रमुख, उद्यानविद्या विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
# लिलाव बाबत सूचना तसेच अटी व शर्ती

विषय: विभाग प्रमुख, उद्यानविद्या विभाग, (मुख्य बगीचा) अंतर्गत निरुपयोगी जडवस्तू व किरकोळ विविधसाहित्याची विक्री करिता मोहर बंद दर पत्रक सादर करणे बाबत ...

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सबंधित सहभागी होणाऱ्या लिलाव धारकास कळविण्यात येते की, विभाग प्रमुख, उद्यानविद्या विभाग, (मुख्य बगीचा) येथील निर्लेखित केलेल्या निरुपयोगी जडवस्तू व किरकोळ विविध साहित्याची खालील अटी व शर्ती च्या अधीन राहून 'बंद लीलीफा' लिलाव पद्धतिने विक्री करणे आहे. तरी इच्छुक लीलावधारकानी आपले दर पत्रक मोहर बंद लिफाफ्यात दिनांक ०७.१०.२०२६ ते १४.१०.२०२६ दरम्यान संध्या ५.३० वाजेपर्यंत विभाग प्रमुख, उद्यानविद्या विभाग, (मुख्य बगीचा) या नावाने उद्यानविद्या महाविद्यालय, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला या कार्यालयात आवक जावक मध्ये देण्यात यावे. अंतिम दिनांक (१४.१०.२०२६ ) नंतर येणाऱ्या दर पत्रकाचा कुठल्याही प्रकारचा विचार करण्यात येणार नाही. प्राप्त दर पत्रक बंद लिफाफा **दि. १५.१०.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता** सर्व सहभागी लीलावधारक व समिती समक्ष उघडण्यात येतील. त्याकरिता दर पत्रक सादर केलेल्या सबंधित लीलावधारकाची या कार्यालयात नमूद वेळेत **(दि. १५.१०.२०२६ रोजी) रु.२०,०००/- (वीस हजार) रकमेचा डिमांड ड्राफ्ट सोबत आधार कार्ड, शॉप परवाना, पॅन कार्ड, यांच्या छायांकित प्रत व मूळ प्रत घेऊन स्वखर्चाने उपस्थित राहणे अनिवार्य आहे.** जे दर पत्रक सादर करणारे लीलावधारक वरील दस्तावेज व डी.डी. सह हजर राहणार नाहीत त्यांची कोणतीही तक्रार नंतर विचारात घेतली जाणार नाही व त्यांना लिलाव प्रकिये मधून बाद करण्यात येईल. सदर प्रकिया बाबत सविस्तर अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत तरी दर पत्रक भरण्यापूर्वी सर्व खाली दिलेल्या अटी व शर्तीचे अवलोकन करावे.

१) फक्त दर पत्रक ( प्रपत्र - १) व ( प्रपत्र - २) बंद लिफाफ्यात दि०७.१०.२०२६ ते १४.१०.२०२६दरम्यान संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत उद्यानविद्या महाविद्यालय, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला या कार्यालयात सादर करावे. त्यानंतर येणारे दर पत्रकाचा विचार करण्यात येणार नाही. तत्पूर्वी ईच्छूक लीलावधारकानी दर पत्रक भरण्यापूर्वी विभागावरील **वस्तूची पाहणी दि०७.१०.२०२६ ते १४.१०.२०२६ दरम्यान कार्यालयीन दिवशी सकाळी १० ते १२ वाजता** दरम्यान करावी. सदरील वस्तू/ साहित्य पाहणी करिता विभाग प्रमुख, उद्यानविद्या विभाग, (मुख्य बगीचा) येथे उपलब्ध राहतील.

२) दर पत्रक भरताना फक्त लिलाव धारकानी दर पत्रक भरावे सोबत ईतर कोणीही जाऊ नये. दर पत्रक भरल्याची पोच पावती लगेच दिल्या जाईल सदरची पावती दि. १५.१०.२०२६ रोजी लीलावात

सहभागी होण्याकरिता रुपये २०,०००/- (वीस हजार) चा डिमांड ड्राफ्ट, शॉप परवाना, पॅन कार्ड, यांच्या छायांकित प्रत व मूळ दस्तावेजसह उपस्थित राहवे.

३) लीफाफ्याच्या वरील बाजूस "**निरुपयोगी जडसाठा साहित्याची खरेदी करिता दर पत्रक** " असे स्पष्ट अक्षरात नमूद करावे.

४) **दर पत्रक सादर करणाऱ्या लीलावधारकास रु. २०,०००/- (वीस हजार)अनामत रकमेचा डिमांड ड्राफ्ट आहरण व संवितरण अधिकारी,उद्यान विद्या विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला(Drawing and disbursing officer, Head, Department of Horticulture, Dr.PDKV, Akola)** यांचे नावे बंद लिफाफ्यात न टाकता स्वतंत्र डिमांड ड्राफ्ट विभाग प्रमुख, उद्यानविद्या विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला या कार्यालयात बंद लिफाफा उघडण्यापूर्वी आधार कार्ड, शॉप परवाना, प्यान कार्ड यांच्या प्रत सह समिती समक्ष लिलावाच्या दिवशी जमा करावेत नंतरच संबधीत दर पत्रक उघडण्यात येतील व लिलाव प्रकीयेत भाग घेता येईल.

५) बंद लीलीफा लिलाव प्रक्रिया सुरु करत असतांना ज्या लीलावधारकाने प्रकीयेत सहभाग घेण्यासाठी रु. २०,०००/- (वीस हजार)डी.डी. अनामत रुक्कम म्हणून जमा केलेला आहे. अशाच लीलावधारकास सदर प्रकीयेत सहभाग घेता येईल.

६) खरेदिदारास जडवस्तू व किरकोळ साठा पाहायचा असल्यास दि. ०७.१०.२०२६ ते १४.१०.२०२६ सकाळी १० ते १२ या कालावधीत कार्यालीयान वेळेत स्वखर्चाने उपस्थित राहून पाहता येईल व पूर्ण पाहणी केल्या नंतर सोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्र १ नुसार दर पत्रक बंद लिफाफा मध्ये प्रपत्र २ सह सीलबंद करून कार्यालयामध्ये दि. ०७.१०.२०२६ ते १४.१०.२०२६(साय. ५.३० पर्यंत) या कालावधीत जमा करावे. (प्रपत्र १ प्रपत्र २) विध्यापीठ्याच्या संकेतस्थळ (www.pdkv.ac.in) येथून प्राप्त करून त्यामध्ये दर भरावेत तसेच त्यासोबत प्रपत्र २ पूर्ण भरून जोडावे .

७) निरुपयोगी जडवस्तू व किरकोळ साठा खरेदिदारास यांचे स्पर्धामक दर मंजूर केल्या जातील त्यास संपूर्ण रुक्कम विहित मुदतीत जमा केल्याशिवाय अवजड वस्तू साठा ताब्यात दिल्या जाणार नाही याची नोद घ्यावी. संपूर्ण रकमेचा भरणा केल्याची कार्यालीयान पावती कार्यालया मार्फत त्वरित दिल्या जाईल. ज्या लीलावधारकाचे दर मंजूर झाले त्यांना लिलावाची संपूर्ण रुक्कम डिमांड ड्राफ्ट च्या स्वरुपात दि.२१.१०.२०२६ पूर्वी /रोजी पर्येत या कार्यालयास जमा करावी लागेल. अन्यथा पुढील बोली असलेल्यालीलावधारकास पाचारण करण्याचे अधिकार कार्यालाकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

८) या कार्यालया कडून वाहन सुविधा, वाहनामध्ये जडवस्तू व किरकोळ साठा भरणा करणे करिता मजूर इत्यादी सुविधा पुरविल्या जाणार नाही. ज्या लीलावधारकाचे दर मंजूर झालेत त्या लीलावधारकास साहित्याची उचल विभाग प्रमुख, उद्यानविद्या विभाग, (मुख्य बगीचा) येथून स्वखर्चाने कार्यालीयानीन वेळेत सात दिवशाच्या आत करावी लागेल.

९) दर पत्रक करावयाचा नमुना प्रपत्र – १ सोबत जोडण्यात आलेला आहे. फक्त त्याच नमुन्यामध्ये जड वस्तू साठा खरेदी बाबतचे साहित्याचे / वस्तूचे दर पत्रक सादर करावे अन्यथा स्पर्धेमधून बाद करण्याचे अधिकार कार्यालाकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

१०) साहित्याचे एकत्रीत दर भरून अधिकृत स्वाक्षरी. नाव व पत्ता सह मोहरबंद लिफाफ्यात विहित मुदतीच्या आत दर पत्रक सादर करणे अनिवार्य आहे . उशीरा प्राप्त होणाऱ्या दर पत्रकाची कुठल्याही प्रकारचा विचार होणार नाही.

११) ज्या लीलावधारकाची बंद लिफाफ्यातील उच्चतम दर मंजूर झाल्या नंतर सदर साहित्याची उचल करण्याची तसेच त्यावरील देखरेखीची जबाबदारी संबंधीताची राहील. तसेच मंजूर दराची संपूर्ण रुकमेचा भरणा डिमांड ड्राफ्ट स्वरुपात केल्या नंतरच सात दिवसाच्या आत सदर साहित्याची उचल करण्यास अनुमती देण्यात येईल. लीलावधारकाने सदर वस्तू उचल करण्यास नकार दिल्यास अनामत रुक्कम परत दिल्या जाणार नाही.

१२) समान दर आढळल्यास संबंधीत समान दरपत्रक सादरकर्ता यांच्या दोघा पैकी जे अधिकतम दर देतील अथवा इतर दर पत्रक सादर करणाऱ्या पैकी जे सर्वाधिक दर संबंधीत साहित्याकरिता देतील अशांनाच सदरचा साहित्या देण्यात येईल.

१३) एकाच व्यक्तीने अथवा प्रतिष्ठानामार्फत एका पेक्षा अधिक दर पत्रक लीलावत सहभागी होण्याकरिता सादर केल्यास सदरचे सारखे दर पत्रक रुद्द करण्यात येतील.

१४) सदर प्रक्रीये बाबत दरपत्रक सादरकर्त्यास कुठल्याही प्रकारचा आक्षेप अथवा तक्रार असल्यास दर पत्रक सादर करण्याच्या दिनांका पूर्वी किवा प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी त्याच दिवशी सादर करावा. एकदा समितीची कार्यप्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कुठल्याच प्रकारचा आक्षेप अथवा तक्रार किवा दावा या कार्यालयामार्फत विचारात घेतल्या जाणार नाही.

१५) जड वस्तू व किरकोळ विक्री लिलाव बाबत अपेक्षित दर प्राप्त न झाल्यास अथवा इतर कुठल्याही वाद उदभवल्यास सदर जडवस्तू व किरकोळ साठा बंद लिफाफा लिलाव अंशता विक्री पूर्णता विक्री किवा संपूर्ण लिलाव प्रक्रिया रुद्द करणे बाबतचे अधिकार विभाग प्रमुख, उद्यानविद्या विभाग डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला तथा लिलाव समिती यांनी राखून ठेवले आहे.त्याबाबत कोणतीही तक्रार ग्राह्य धरण्यात येणार नाही.

१६) संबंधीत दरपत्रक सादरकर्त्यास वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्या बाबतचे स्वतंत्र प्रमाणपत्र (प्रपत्र २) नुसार लिफाफ्यात नाव, स्वाक्षरी व आधार कार्ड प्रत सह सादर करणे आवश्यक आहे.

स्वा/-
विभाग प्रमुख,
उद्यानविद्या विभाग,
डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला

प्रतीलीपी: मा.प्रभारी अधिकारी, संगणक कक्ष (Aris Cell ) डॉ. पं.दे. कृ.वि.अकोला यांना विद्यापीठ, अकोला यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्धी करिता सादर.

## प्रपत्र – १

## दर पत्रक नमुना

प्रती, दिनांक:....................

विभाग प्रमुख,
उद्यानविद्या विभाग
डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला

विषय: विभाग प्रमुख, उद्यानविद्या विभाग डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला येथील जडवस्तू व किरकोळ विविध साहित्याची विक्री मोहर बंद दर पत्रक सादर करणे बाबत...

संदर्भ: विद्यापीठसंकेतस्थळ प्रसिद्धी पत्रक दिनांक...........

महोदय,

मी खालील सही करणार वरील विषयानुसार उद्यानविद्या विभाग येथील प्रत्यक्ष पाहणी केल्यानुसार निरुपयोगी जडवस्तू व किरकोळ विविध साहीत्याच्या खरेदीच्या लिलावात सहभागी होण्याकरिता खालील प्रमाणे दर सादर करीत आहे.

| | एकत्रित रुक्कम/दर (रु) |
|---|---|
| एकत्रित जड वस्तू व किरकोळ साहित्य खरेदी बाबत दर. | |

अक्षरी रुपये: ..........................................................................................................

स्वाक्षरी ..................................

नाव........................................

दिनांक:..................................

आधार क्र. ..........................

मोबाईल क्र............................

# प्रपत्र – २

## प्रमाणपत्र

मी खालील सही करणार दर पत्रक सादरकर्ता या द्वारे प्रमाणीत करतो की, विभाग प्रमुख, उद्यानविद्या विभाग डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला मार्फत बंद लिफाफा लिलाव प्रक्रिया मध्ये कोणाच्याही दबावाखाली न राहता स्वमर्जीनि सहभागी होत आहे. तसेच लिलावा करिता नेमून दिलेल्या सर्व अटी व शर्ती (अ.क्र. १ ते १६) मला मान्य असून त्याच्या अधीन राहून मी सदरच्या बंद लिफाफा लिलाव प्रक्रिया मध्ये दर सादर करीत आहे.

तसेच दर सादर करण्यापूर्वी मी स्वतः सर्व साहित्याची जड वस्तूची प्रत्येक्ष पाहणी करून व सर्व अटी व शर्तीचे अवलोकन करून दर सादर केलेले आहेत व त्याबाबत मला कुठलाही आक्षेप अथवा दावा राहणार नाही याची मी खात्री देतो. मी लिलावामध्ये सहभागी होताना रु. २०,०००/-(वीस हजार) चा डिमांड ड्राफ्ट, आधार कार्ड, शॉप परवाना, पॅन कार्ड इत्यादी ची छायांकित प्रत व मूळ प्रती सह स्वतः उपस्थित राहणार असून मी सदर दस्तावेज लिलावा दरम्यान सादर न केल्यास माझे दर पत्रक खारीज / रुद्द केल्या जाणार असल्याची मला पूर्ण जाणीव आहे. सदर बंद लिफाफा लिलाव प्रक्रियेत माझा प्रतिनिधी आल्यास त्या सोबत Authority letter देण्यात येईल.

स्वाक्षरी ....................................

दर पत्रक सादर करणाऱ्याचे नाव....................................

पत्ता: ..............................................................................

आधार क्र. ...................................................................

मोबाईल क्र....................................................................